**प्रेस नोट** **दिनांक ३१/०३/२०१९**

**कोंढवा पोलीस ठाणे**

**कम्युनिटींग पोलिसींग अतंर्गत सोसायटी सभासदाची मिटींग आयोजीत केले बाबत.**

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे योजने अतंर्गत कोंढवा पोलीस ठाणे हद्दीतील यशोधन को-ऑप. सोसायटी व्हि.आय.आय.आय.टी कॉलेजजवळ कोंढवा बुा. पुणे याठिकाणी कम्युनिटींग पोलिसींग अतंर्गत नमुद सोसायटी सभासदाची मिटींग आज रोजी सकाळी ११/०० ते १२/००वाजणेचे दरम्यान आयोजीत केली होती.

नमुद वेळी सोसायटी सभासदांना आपले सोसायटीत भाडेकराराने राहणारे भाडे करु तसेच सफाई कामगार, सिक्युरीटी गार्ड यांचे पोलीस व्हेरिफिकेश करुन घेणेबाबत तसेच नमुद व्हेरिफिकेशनमुळे होणारे फायदे तसेच पोलीसांना कामकाजात होणारे फायदे याबाबत तसेच सध्या पासपोर्ट व्हेरिफिकेशनबाबत झालेल्या सुधारणा त्यामुळे लोकांचे वेळेची बचत याबाबत महिती देवुन सोसायटी आवारात तसेच सोसायटीचे गेटवर रोड व्याप्त करणारा चांगले दर्जाचे सीसीटीव्ही लावलेस त्यामुळे सोसायटी आवारात होणाया घरफोडया तसेच वाहन चोरी व रोडवरील लावलेल्या सीसीटीव्ही मुळे एखादी सनसनाटी घटना उघड होणेस होणारी मदत याबाबत माहिती देवुन कोंढवा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. १८३/२०१९ भा.द.वि.कलम ३६३ मधील अल्पवयीन वय वर्षे ३ वर्षे या मुलाचा लागलेला शोध याबाबत माहीती सांगुन नमुदचा गुन्हा उघड होणेस रोडवरील सीसीटीव्ही फुटेजमुळे मदत झालेली असल्याचे सांगुन सोसायटी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाना उत्तरे दिली. व त्याचे शंकाचे निराकारण केले.

नमुदवेळी सदर बैठकीला १२५ ते १५० सोसायटी सभासद हजर होते. तसेच नमुदची मिटींग वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. अनिल पाटील, महादेव कुंभार पोलीस निरिक्षक(गुन्हे)तसेच कोंढवा पोलीस ठाणेकडील पोलीस कर्मचारी स्टाफ हजर होते.